आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ मार्च २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मॉरिशस बरोबर भारताचे अनेक सामंजस्य करार / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज स्वीकारणार मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान

- अवैध कोळसाखाणी बंद करण्याची जबाबदारी राज्यसरकारांची असून अपघात टाळण्याकरता राज्यसरकारांबरोबर योजना तयार करत असल्याचं केंद्र सरकारचं लोकसभेत निवेदन

- महाराष्ट्र विधानसभेत लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवरून विरोधकांचा सभात्याग

**आणि**

- ग्रीनलँडच्या संसदीय निवडणुकीत डेमोक्रेटीट या पक्षाची २९ पूर्णांक ९ दशांश टक्के मतं मिळवून आघाडी

**<><><><><>**

भारत-मॉरिशस दरम्यान सुधारित धोरणात्मक भागीदारी बनवण्याचा निर्णय आपण घेतला आहे, अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. प्रधानमंत्री दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर असून आज झालेल्या दोन्ही देशांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत आणि मॉरिशसमध्ये असलेल्या भागीदारीविषयी ते म्हणाले..

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

भारत-मॉरिशसच्या भागीदारीचा एक भाग म्हणून मॉरिशसच्या संसद भवनाच्या निर्माणात भारत सहाय्य करेल. मॉरिशसमध्ये १०० किलोमीटर लांबीच्या पाण्याच्या पाईपच्या आधुनिकीकरणासाठी काम केलं जाईल. सामुदायिक

विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात ५०० मिलियन मॉरिशियन रुपये खर्चाची विकासकामं सुरू केली जातील, अशी घोषणाही मोदी यांनी केली.

भारत आणि मॉरिशसमध्ये अंतराळ संशोधन, एआय, आरोग्य, सागरी अर्थव्यवस्था, माहिती आणि तंत्रज्ञान तसंच सायबर सुरक्षा या विषयांमध्ये परस्पर संबंध दृढ करणं हे दोन्ही देशांचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीनचंद्र रामगुलाम यांनी सांगितलं. भारतानं मॉरिशसच्या आरोग्य क्षेत्रात आधुनिकीकरण आणलं आहे, त्यासाठी आपण भारताचे आभार मानतो, असं ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात मोदी आणि रामगुलाम यांनी मॉरिशसमधल्या आरोग्य केंद्राचं उद्घाटन केलं.

स्थानिक चलनासाठी सेटलमेंट सिस्टिम, क्रेडिट सुविधा करार, राजदुतांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, व्हाईट शिपिंग माहितीची देवाणघेवाण, आर्थिक गुन्ह्यांना प्रतिबंध, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात सहकार्य, सुशासनासाठी सार्वजनिक अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण या विषयांशी संबंधित ८ सामंजस्य करार उभय देशात झाले.

थोड्याच वेळात साजऱ्या होणाऱ्या मॉरिशसच्या ५७ व्या राष्ट्रीय दिवस समारंभात प्रधानमंत्री मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ प्रदान करण्यात येणार आहे. काल भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात नवीनचंद्र रामगुलाम यांनी या पुरस्काराची घोषणा केली. प्रधानमंत्री मोदी यांना इतर देशांकडून मिळालेला हा २१वा सर्वोच्च नागरी सन्मान आहे.

**<><><><><>**

अवैध कोळसाखाणी बंद करण्याची जबाबदारी राज्यसरकारांची असल्याचं आज केंद्रसरकारनं लोकसभेत सांगितलं. आसाममधे रॅटहोल कोळसाखाणींमधे झालेल्या अपघातात कामगारांचा मृत्यू झाल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला केंद्रीय कोळसामंत्री जी किशन रेड्डी उत्तर देत होते. या संदर्भात आपण आसामचे

मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्याशी चर्चा केली असून एकूणच कोळसाखाणींमधे अपघातांचं प्रमाण  कमी करण्यासाठी केंद्रसरकार राज्यसरकारांशी संपर्कात आहे, असं ते म्हणाले. कोळसाखाणींमधली सुरक्षितता सर्वात महत्त्वाची आहे, झारखंड मधे बेकायदेशीर कोळसाखाणी बंद करण्यासंदर्भात तिथले मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी आपण बोललो असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात ऑक्टोबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याआधी २ कोटी ३३ लाख ३३ हजार महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला, ही संख्या आता २ कोटी ४७ लाख झाल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. तसंच या योजनेच्या लाभार्थ्यांना २१०० रुपये मदत देण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल असं त्यांनी सांगितलं. आमदार रोहित पवार, वरुण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नमो सन्मान योजनेचा लाभ मिळणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही असं तटकरे यांनी स्पष्ट केलं. मात्र अशा महिलांना एक हजार रुपये नमो सन्मान योजनेतून आणि पाचशे रुपये लाडकी बहीण योजनेतून दिले जातील असं त्या म्हणाल्या. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने प्रश्न विचारण्याची परवानगी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मागितली. मात्र विधानसभा अध्यक्षांनी ती फेटाळून लावत पुढचं कामकाज सुरू केलं. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली आणि सभात्याग केला. टोरेस सारख्या गुंतवणूक कंपन्यांकडून देण्यात येणारं मोठा व्याज परतावा देण्याचं आश्वासन हा ९९ टक्के प्रकरणांमध्ये  घोटाळा असतो त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या गुंतवणूक करू नये असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कराड इथं प्रीतीसंगम समाधी स्थळावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यावेळी उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिलेल्या आदर्श विचारांवर राज्य शासन काम करत असल्याचं पवार यावेळी म्हणाले.

<><><><>

मानेसर, गुरुग्राम, फरिदाबाद, हिसार, रोहतक, करनाल, यमुनानगर, पानिपत, अंबाला आणि सोनीपत या महानगरपालिकांच्या महापौर आणि नगरसेवकपदांसाठी या महिन्याच्या सुरुवातीला निवडणूक झाली होती. अंबाला आणि सोनीपत या महापालिकांच्या महापौरपदासाठी पोटनिवडणूक झाली. अंबालामध्ये भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवार शैलजा सचदेवा यांनी विजय मिळवला, तर हरियाणात आठ महापालिकांमध्ये भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. फरिदाबादमध्ये परवीन जोशी, हिसारमधून प्रवीण पोपली, करनालमध्ये रेणू बाला गुप्ता, पानिपतमध्ये कोमल सैनी, सोनीपतमध्ये राजीव जैन आणि यमुनानगरमध्ये सुमन हे भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. मानेसरमध्ये मात्र भाजपचे उमेदवार सुंदर लाल पिछाडीवर होते.

<><><><>

क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत होणाऱ्या वेव्ज २०२५ परिषदेत सिम्फनी ऑफ इंडिया स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी ११२ संगीतकारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ८० शास्त्रीय संगीतकार तसंच लोककलाकारांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्देश विविध शैलींच्या संगीताला एकाच छताखाली आणून सादर करणं असा आहे. दूरदर्शन आणि महावीर जैन फिल्म्स यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या उपक्रमाची अंतिम फेरी १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><>**

ग्रीनलँडच्या संसदीय निवडणुकीत डेमोक्रेटीट या पक्षानं २९ पूर्णांक ९ दशांश टक्के मतांसह बाजी मारली आहे. आर्क्टिक खंडावर वर्चस्व स्थापन करण्यासाठी अमेरिका-चीन-रशिया यांच्यात चढाओढ सुरु असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या भागाचा ताबा घेण्याचा मानस जाहीर केला त्यामुळे या निवडणुकीकडे साऱ्या जगाचं लक्ष होतं. ग्रीनलँड हा डेन्मार्कच्या स्वामित्वाखालचा स्वायत्त प्रदेश असून डेन्मार्कपासून पूर्ण स्वातंत्र्य मिळवण्याकडे सर्व राजकीय पक्षांची वाटचाल सुरु आहे.  ग्रीनलँडच्या अंतर्गत सुरक्षा, संरक्षण, परराष्ट्रव्यवहार आणि पतधोरणावर अजूनही डेन्मार्कचं नियंत्रण आहे.

**<><><><>**

युक्रेनने तीस दिवसांच्या तत्काळ आणि तात्पुरत्या युद्धबंदीच्या प्रस्तावाला सहमती दर्शवली असून त्याला प्रतिसाद देण्याची जबाबदारी रशियावर असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेनं, युक्रेनला गुप्तवार्ता आणि लष्करी मदत पुरवण्यावरची स्थगिती उठवली आहे. सौदी अरेबियात युक्रेनच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मॅक्रो रुबियो यांनी वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात, युद्धबंदी लागू करण्याच्या कराराला परस्पर सहमतीनं मुदतवाढ देता येऊ शकेल, असं म्हटलं असून शांतता राखण्यासाठी रशियाकडून परस्पर सहकार्य महत्त्वाचं असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><>**

खेलो इंडिया हिवाळी खेळांचा दुसरा टप्पा आज गुलमर्ग इथं समाप्त होणार आहे. समारोप समारंभाला केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय उपस्थित राहणार आहेत. या खेळांचा पहिला टप्पा २३ ते २७ जानेवारी दरम्यान

लडाखमध्ये यशस्वीरित्या पार पडला. इथल्या एनडीएस स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि गुफुक तलाव इथं आइस हॉकी आणि आइस-स्केटिंग स्पर्धा झाल्या. भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि जम्मू-काश्मीर क्रीडा परिषदेनं या स्पर्धांचं उत्कृष्ट नियोजन केल्याचं भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे उपमहासंचालक विनीत कुमार यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

बर्मिंगहम इथं सुरू असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेन आणि मालविका बनसोड यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**//<><><><><>//**